**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४०७/२०१५ मध्ये निशाणी १५२ खालील आदेश</u>**
**(MHST070028722015)**

शंकर तुकाराम थोरात व इतर ––– वादी
वि.
सुभाष राघू लोहार व इत ––– प्रतिवादी

प्रस्तुत अर्ज प्रतिवादींनी निशाणी १४८ चे सरतपासावर "उलटतपास नाही" चा झालेला आदेश रद्द होवून उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे कथन आहे की, प्रतिवादी हे व्यावसायिक कामामुळे सकाळचे सत्रात न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे दि.१०/०४/२०२४ रोजी नि.१४८ चे वादीतर्फे साक्षीदार क्र. ५ यांचे सरतपासावर "उलटतपास नाही" चा आदेश पारीत झाला. परंतु, सदर साक्षीदाराचा उलटतपास घेणेचा आहे. सबब, त्यांचेविरुध्द "उलटतपास नाही" चा झालेला आदेश रद्द करण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

३. सदर अर्जास वादीने आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतलेली आहे. वादीचे कथन आहे की, अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. सदर अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत. सबब, सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे. विकल्पेकरून, अर्ज मंजूर करणेचा झालेस रू.५,०००/– चे खर्चावर मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. निशाणी १५२ वरील

अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादीतर्फे साक्षीदार क्र. ५ यांनी नि.१४८ वर दि.१०/०४/२०२४ रोजी सरतपास दाखल केलेले असून प्रतिवादीस नि.१४८ वर उलटतपास घेणेकरीता पुरेशी संधी दिली गेलेली होती. परंतु, प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्याने त्यांचेविरुध्द "उलटतपास नाही" आदेश पारीत करणेत आला आहे. परंतु उभयपक्षांना आपली बाजू मांडण्याची व त्या अनुषंगाने उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाचे दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे योग्य व न्याय्य आहे. तसेच अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, प्रतिवादींच्या दिरंगाईमुळे वादीस झालेला त्रास लक्षात घेता सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अर्ज (निशाणी १५२) रुपये २००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादींनी वादीस वर नमूद खर्च रक्कम दिल्यानंतर प्रतिवादींना उलटतपास घेणेस परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2025.04.29 17:12:46 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )

दि. २९/०४/२०२५. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कराड.